# प्रेसनोट

येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ७६५/२०१७ भादविकलम ४५४,४५७,३८० मधील फिर्यादी नामे बसमिल्लाबाबा बहाद्दुर शेख वय ३८ वर्षे रा. फ्लॅट नं. के ५ लक्ष्मीपुरम हुसेनशहा बाबा दर्ग्यासमोर मेन्टल कॉर्नर येरवडा पुणे यांचे राहते घर दि. २७/८/२०१७ रोजी सायंकाळी ४.३० वा. ते दिनांक १७/९/२०१७ रोजी सायं. ५.१५ दरम्यान कुलुप लावुन बंद असतांना यातील आरोपी नामे १) सतिश विठ्ठल गिरी वय २३ रा. मास्फळा ता. गेवराई जि. बीड २) योगेश विठ्ठल गिरी वय २५ रा. सदर ३) संदीप शरद बन वय २६ रा. मु. पो. शिवने केसोबा मंदीराजवळ ता. जालना जि. जालना यांनी डुबलीकेट चावीने फ्लॅटचे कुलुप उघडुन आत मध्ये प्रवेश करुन डुबलिकेट चावीने बेडरुमचे कुलुप खोलुन बेडरुम मध्ये असेलेले लोखंडी कपाटाचे लॉक डुबलिकेट चावीने खोलुन आतील लॉकर _ डुबलिकेट चावीने खोलुन लॉकरमध्ये ठेवलेली ३६,२५,०००/- रोख रक्कम व ४ तोळे ४१ ग्रॅमचे सोन्याचे दागिने घरफोडी चोरी केलेली आहे. सदरबाबत फिर्यादी बसमिल्लाबाबा बाहद्दुर शेख यांनी दि. २३/९/१७ रोजी फिर्याद दिल्याने १८.४७ वा. वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरचा गुन्हा झालेनंतर मा. पोलीस उप- आयुक्त श्री. दिपक साकोरे , परिमंडळ ४ पुणे , मा. सहा. पोलीस आयूक्त श्री. वसंत तांबे खडकी विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मुकुंद महाजन, पोलीस उप- निरीक्षक प्रविण देशमुख ,पोलीस उप – निरीक्षक गणेश कुताळ ,पोलीस उप-निरिक्षक रविन्द्र गवारी, तपास पथक पो.हवा. बाळु बहिरट , अजिज बेग, नामदेव सुपे , पो.ना. सचिन रणदिवे, पो.शि. सुनिल सकट , सचिन पाटील, सागर कोतवाल यांनी गुन्हयातील आरोपी १) सतिश विठ्ठल गिरी वय २३ रा. मास्फळा ता. गेवराई जि. बीड २) योगेश विठ्ठल गिरी वय २५ रा. सदर ३) संदीप शरद बन वय २६ रा. मु. पो. शिवने केसोबा मंदीराजवळ ता. जालना जि. जालना यांना विश्रांतावाडी पुणे येथुन २४/९/२०१७ रोजी ताब्यात घेवुन कसुन तपास करुन गुन्हयातील १६,५०,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत केलेली आहे. तसेच गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने किंमत रुपये ८१,७००/- तसेच सारस्वत बॅंक विश्रांतवाडी शाखा पुणे येथे आरोपी सतिश गिरी यांचे अकांऊन्टवर २,०००००/- ठेवले आहे. असा एकुण १८,५०,०००/- व रोख ८१,७०० रुपयाचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

